संक्षिप्त फौजदारी प्रकरण क्रमांक १७२/२०२५
सरकार वि. गंगाधर
<u>**नि. क्र. ०९ लगत**</u>

अभियोग पक्षातर्फे **सा. क्र. १**

मी शपथेवर कथन करतो की,

**माझे नाव – अलीमखान अहमदखान पठाण**

**वय – ३४ वर्ष, व्यवसाय– शेती,**

**राहणार– पेठशिवणी, ता. पालम, जि. परभणी.**

**सहाय्यक सरकारी वकील श्री. एस. एन. डावकरे यांच्यातर्फे सरतपास सुरू.**

१. मला मराठी समजते व बोलता येते. मी आरोपीला ओळखत नाही. दिनांक १९/११/२०२४ रोजी मला दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग गंगाखेड यांनी जप्ती पंचनाम्याकरीता कुठेही बोलावले नव्हते. माझ्यासमक्ष त्यांनी काहीही जप्त केलेले नाही. सदर गुन्ह्यातील पंचनाम्याविषयी मला काहीही माहिती नाही. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने मला काही सांगावयाचे नाही. दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग गंगाखेड माझी एका कागदावर सही घेतली होती. मला माझी सही दाखवल्यास मी ओळखु शकतो. आता मला जप्ती पंचनाम्यावरील माझी सही दाखवण्यात आली. जप्ती पंचनाम्यावर अ.नं. १ ला सही आहे. ती माझीच आहे. त्या सहीस **नि.१३** देण्यात येते. जप्ती पंचनाम्यातील मजकुरा विषयी मला माहिती नाही.

**(सरकारी वकीलांनी सदरचा साक्षीदार हा अभियोग पक्षास सहाय्य करत नसलेने त्यास सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. सरकारी वकीलांनी केलेल्या विनंतीनुसार सदर साक्षीदार सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी आणि साक्षीदारची विधाने खंडण करणेची अनुमती दिली.)**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १९/११/२०२४ रोजी मला दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग गंगाखेड जप्ती पंचनामा करण्यासाठी पेठशिवणी बस स्टॉप येथील एका टपरी जवळ बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यांच्या बोलवण्यानुसार मी त्या टपरीजवळ गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्याठिकाणी डमरे साहेब यांनी आम्हाला गुन्ह्याची माहिती दिली व आरोपीला झडतीचा उद्देश सांगितला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या टपरीमधुन देशी दारू भिंगरी संत्राच्या प्रत्येकी १८० मि. ली. मापाच्या ४८ बाटल्या व विदेशी दारू मॅकडॉल नं. १ च्या प्रत्येकी १८० मि. ली. मापाच्या १४ बाटल्या जप्त केल्या. हे म्हणणे खरे नाही की, तपासणीकरीता त्यातील एक–एक

बाटलीवर माझी, दुसऱ्या पंचाची व पोलीसांच्या सह्या घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की, नमुना बाटल्यांवर माझी, दुसऱ्या पंचांची व पोलीसांच्या सह्यांचे लेबले लावुन त्या बाटल्या पितळी लाखमोहर सिलने जागीच सिलबंद केली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग गंगाखेड आरोपीच्या ताब्यातुन दारू जप्त करून त्याचा पंचनामा करून त्यावर मी सही केली. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हा माझ्या गावातील असुन तो माझा शेजारी असल्यामुळे मी त्याला ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आरोपीला वाचवण्याकरीता खोटी साक्ष देत आहे.

**<u>सरतपास पुर्ण</u>**

**<u>आरोपीतर्फे वकील श्री. एस. आर. रोकडे यांनी उलटतपास नाकारला.</u>**

दिनांक ०४/०७/२०२६

| | |
|---|---|
| सा.वा.दा.ब.अ.क.केले. | श्रवणोत्तर स्विकृत, |
| समक्ष, | |
| MANISHA MAHADEO PATIL Digitally signed by MANISHA MAHADEO PATIL Date: 2026.07.04 16:42:50 +0530 | MANISHA MAHADEO PATIL Digitally signed by MANISHA MAHADEO PATIL Date: 2026.07.04 16:42:55 +0530 |
| (मनिषा म. पाटील) | (मनिषा म. पाटील) |
| प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पालम. | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पालम. |